पिंपरी चिंचवड महानगरपालिका, पिंपरी - ४११ ०१८

मा.महापालिका सभा

कार्यपत्रिका क्रमांक -४०

सभावृत्तांत

दिनांक :- ०१.१२.२००९ वेळ-सकाळी ११.०० वाजता

मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १९ अन्वये मा.महापौर व मा.उपमहापौर यांची निवड करण्यासाठी महापौर आणि उपमहापौर या पदांसाठी निवडणुका घेणे नियम २००५ मधील नियम क्र.३ (१) (२) अन्वये पिंपरी चिंचवड महानगरपालिकेची विशेष महापालिका सभा [विशेष बैठक] मंगळवार दिनांक ०१ डिसेंबर २००९ या दिवशी सकाळी ११:०० वाजता महानगरपालिका प्रशासकीय इमारतीमधील यशवंतराव चव्हाण सभागृहात आयोजित करणेत आली होती. सभेस खालील सन्मा. सदस्य उपस्थित होते.

१. मा.अपर्णा निलेश डोके महापौर
२. मा.बो-हाडे शरद परशुराम उपमहापौर
३. मा.भालेकर शांताराम कोंडीबा
४. मा. घुले रघुनंदन रामभाऊ
५. मा.जाधव विजया अशोक (मामी)
६. मा.थोरात एकनाथ दादा
७. मा.दत्तात्रय बाबुराव साने
८. मा.लोखंडे सुजाता सुनिल
९. मा.जाधव माऊली उर्फ ज्ञानेश्वर
१०. मा.आल्हाट शांता महेंद्र
११. मा.डॉ. सौ. मीना पाटील

१२. मा.खेडकर घनशाम रामचंद्र

१३. मा.सौ.सारिकाताई संतोषभाऊ लांडगे

१४. मा.सौ. बढे सुलोचना बबन

१५. मा.गवळी विजया पंडित

१६. मा.अजित दामोदर गव्हाणे

१७. मा.वसंत (नाना) आनंदराव लोंढे

१८. मा.महेश किसन लांडगे

१९. मा.फुगे सुनंदाताई विजय

२०. मा.आशा अंकुश लांडगे

२१. मा.मोहिनी विलास लांडे

२२. मा.लोंढे संतोष ज्ञानेश्वर

२३. मा.सौ. वर्षा विलास मडीगेरी

२४. मा.सावळे सिमा

२५. मा.ननावरे जितेंद्र बाबासाहेब

२६. मा.भुंबे बाळासाहेब दिगंबर

२७. मा.डॉ.वैशालीताई घोडेकर

२८. मा.राजेश उर्फ रामकृष्ण गोविंद स्वामी पिल्ले

२९. मा.भोसले हनुमंतराव भिमराव

३०. मा.यशवंत भोसले

३१. मा.बहल योगेश मंगलसेन

३२. मा.कदम निर्मला सदगुरु

३३. मा.सौ.गुंजेकर स्मिता रमेश

३४. मा. चौधरी अख्तरहुसेन तालुकदार

३५. मा.काळूराम मारुती पवार

३६. मा.आझम फकीरभाई पानसरे

३७. मा. चांदगुडे महेश गंगाराम

३८. मा.श्री.बाबर प्रकाश धरमसी

३९. मा.भापकर मारुती साहेबराव

४०. मा.शेट्टी जगदिश

४१. मा.सौ. मंगलाताई अशोक कदम

४२. मा.बोबडे भिमा सखाराम

४३. मा.उबाळे सुलभा रामभाऊ

४४. मा.गवळी शशीकिरण

४५. मा.तानाजी विठ्ठल खाडे

४६. मा.उबाळे वैशाली संजय

४७. मा.सुमनताई मधुकर पवळे

४८. मा.कुमार आर. एस.

४९. मा.सौ. नंदा विकास ताकवणे

५०. मा.भालेराव ज्ञानेश्वर निवृत्ती

५१. मा.कुटे गोपाळ नाना

५२. मा.शरद उर्फ राजू मिसाळ

५३. मा.भोंडवे तुकाराम महादू

५४. मा.गणेश तुकाराम भोंडवे

५५. मा.साळुंके राजेंद्र गुलाबराव

५६. मा.वाघ रघुनाथ दलपत

५७. मा.सौ. आशा ज्ञानेश्वर सुर्यवंशी

५८. मा.भाऊसाहेब सोपानराव भोईर

५९. मा.आण्णा दादू बनसोडे

६०. मा.तिकोने हरिभाऊ किसन

६१. मा.बाराहाते शरद भगवंतराव

६२. मा.गावडे  जयश्री वसंत

६३. मा.साबळे  जगन्नाथ दगडू

६४. मा.गुरुबक्ष किसनदास पहलानी

६५. मा.रामआधार धारिया

६६. मा.आसवानी डब्बु

६७. मा. ॲड. अमर साधूराम मुलचंदानी

६८. मा.सौ.वाघेरे उषा संजोग

६९. मा.विठ्ठल ऊर्फ नाना काटे

७०. मा.तापकीर मच्छिंद्र भाऊसाहेब

७१. मा.भारती ज्योती सुखलाल

७२. मा.कोकणे संतोष अंकुश

७३. मा.सुतार विजया विजय

७४. मा.दरेकर सतीश दगडू

७५. मा.आण्णा ऊर्फ मनोहर पवार

७६. मा.बारणे संतोष नागु

७७. मा.बारणे सिध्देश्वर बाळासाहेब

७८. मा.कलाटे कमल तानाजी

७९. मा.सौ. नांदगुडे सुजाता विलास

८०. मा.खोमणे लता हनुमंत

८१. मा.प्रशांत शितोळे

८२. मा.ढोरे उषा ऊर्फ माई मनोहर

८३. मा.अशोकभाई सोनवणे

८४. मा.सौ. गारवे सावित्री किशोर

८५. मा.साळुंखे सुरेखा मारुती

८६. मा.सौ. जगताप कल्पना कैलास

८७. मा.जगताप शंकर पांडुरंग

८८. मा.धराडे शकुंतला भाऊसाहेब

८९. मा.एकनाथ मोटे

९०. मा.सौ. गावडे सुषमा गोविंद

९१. मा.गायकवाड सुरदास तुकाराम

९२. मा.काटे राजेंद्र भिकनशेठ

९३. मा.नितीन ऊर्फ सनी रामचंद्र ओव्हाळ

९४. मा.सोनकांबळे चंद्रकांता लक्ष्मण

९५. मा.सुपे भाऊसाहेब रामभाऊ

९६. मा. हनुमंत बाळासाहेब गावडे

९७. मा. उत्तम मुक्ताजी हिरवे

९८. मा. प्रेमकुमार शंकरन नायर ऊर्फ बाबू नायर

९९. मा. एकनाथ रावसाहेब पवार

याशिवाय मा.उमाकांत दांगट-अतिरिक्त आयुक्त (पुणे मनपा), मा.आशिष शर्मा-आयुक्त, मा.डुंबरे-अति.आयुक्त, मा.देशमुख, मा.सावंत-सहा.आयुक्त, मा.काळे-नगरसचिव, मा.सुर्यवंशी-कायदा सल्लागार, मा.गायकवाड-जनसंपर्क अधिकारी हे अधिकारी सभेस उपस्थित होते.

मा.पिठासीन प्राधिकारी :- सन्मा.सदस्य, सन्मा.आयुक्त, उपस्थित सर्व अधिकारी

(मा.उमाकांत दांगट)

यांचे मी मनपुर्वक स्वागत करतो. आजच्या विशेष बैठकीत महापौर आणि उपमहापौर यांची निवड हा विषय आहे त्यासाठी मा.विभागीय आयुक्त यांनी क्र.नपा-१-कावि/३१८/०९ दि.२०/११/०९ च्या आदेशान्वये त्यांचा प्रतिनिधी म्हणुन विशेष सभेचा अध्यक्ष म्हणून उमाकांत दांगट अतिरिक्त आयुक्त पुणे महानगरपालिका यांना म्हणजे मला याठिकाणी नियुक्त केलेले आहे. विषय निवडणुका संबंधीचा असल्याने त्याबाबतच्या कार्यपध्दतीची माहिती देण्यात येईल व त्या पध्दतीने अधिनियमाअंतर्गत नियम तरतुदीप्रमाणे निवडणुक घेणेत येईल.

(मा.महापौर व मा.उपमहापौर यांची निवड करण्यासाठीच्या कार्यपध्दतीची माहिती देण्यात आली)

मा.नगरसचिव :- मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १९ मध्ये तरतूद केल्याप्रमाणे मा.महापौर व मा.उपमहापौर यांची निवड मुंबई प्रांतिक महानगरपालिका ( महापौर आणि उपमहापौर या पदांसाठी निवडणुका घेणे) नियम २००५ प्रमाणे करणे.

१) महाराष्ट्र महानगरपालिका ( महापौर पदांचे आरक्षण) नियम २००६ अन्वये पिंपरी-चिंचवड महानगरपालिकेचे महापौर पद “अनारक्षित” असे आहे.) मा.महापौर निवडणुक कामकाजाची व्हिडीओ चित्रणाद्वारे नोंद घेणेकामी व्हिडीओ चित्रीकरणाची व्यवस्था करणेत आलेली आहे.

२) मुंबई प्रांतिक महानगरपालिका (महापौर आणि उपमहापौर या पदांसाठी निवडणुका घेणे) नियम २००५ मधील नियम क्र.५ अन्वये मा.महापौर व मा.उपमहापौर यांची निवड करण्यासाठी विशेष बैठकीच्या अध्यक्षस्थानी मा.विभागीय आयुक्त अथवा त्यांचा प्रतिनिधी असेल. ( मा.विभागीय आयुक्त यांचेकडील आदेश क्र.नपा-१/कावी-३१८/२००९ दि. २०/११/२००९

अन्वये मा.महापौर आणि मा.उपमहापौर यांची निवड करण्यासाठी विशेष बैठकीच्या अध्यक्षस्थानी मा.विभागीय आयुक्त पुणे यांचे प्रतिनिधी मा. उमाकांत दांगट,अतिरिक्त आयुक्त पुणे महानगरपालिका हे असतील.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या महापौर पदाकरिता एकूण ५ नामनिर्देशनपत्रे मुदतीत दाखल झालेली आहेत त्यामध्ये उमेदवार व त्यांचे सुचक,अनुमोदक यांची नावे पुढीलप्रमाणे आहेत.

| अ. क्र. | उमेदवारांचे नांव | सुचकाचे नांव | अनुमोदकाचे नांव |
|---|---|---|---|
| १. | माऊली ऊर्फ ज्ञानेश्वर किसनराव जाधव | भिमा सखाराम बोबडे | प्रकाश धरमसी बाबर |
| २. | बहल योगेश मंगलसेन | आझम फकिरभाई पानसरे | अपर्णा निलेश डोके |
| ३. | बहल योगेश मंगलसेन | शेट्टी जगदिश | राम आधार धारीया |
| ४. | बहल योगेश मंगलसेन | प्रशांत शितोळे | भालेराव ज्ञानेश्वर निवृत्ती |
| ५. | बहल योगेश मंगलसेन | खानोलकर मनोज विक्रम | साबळे जगन्नाथ दगडू |

मुदतीत दाखल झालेली एकुण पाच नामनिर्देशनपत्रे मा.पिठासिन प्राधिकारी यांचेकडे सुपूर्द करण्यात येत आहेत.

मा.पिठासीन प्राधिकारी :- महापौर पदासाठी मुदतीत दाखल झालेली एकुण पाच नामनिर्देशनपत्रे माझ्याकडे सुपूर्द करण्यात आलेली आहेत. मुदतीत दाखल एकुण पाच नामनिर्देशन पत्रांची छाननी करण्यात आलेली आहे ती सर्व नामनिर्देशनपत्रे वैध आहेत व स्विकारणेत आलेली आहेत महापौर पदाकरिता वैधपणे नामनिर्देशित उमेदवारांची नावे पुढीलप्रमाणे आहेत

१) माऊली ऊर्फ ज्ञानेश्वर किसनराव जाधव २) बहल योगेश मंगलसेन.

कोणत्याही उमेदवारास १५ मिनीटाच्या आत म्हणजे सकाळी ११:१२ पासून सकाळी ११:२७ पर्यंत त्याने सही केलेली लेखी नोटीस देऊन त्याची उमेदवारी मागे घेता येईल.

( उमेदवारी मागे घेण्यासाठीचा अवधी संपला )

मा.पिठासीन प्राधिकारी :- उमेदवारी मागे घेण्यासाठी दिलेला अवधी संपलेला आहे. उमेदवारी मागे घेण्यासाठी दिलेल्या अवधीमध्ये १) माऊली ऊर्फ ज्ञानेश्वर किसनराव जाधव यांनी त्यांची उमेदवारी रितसर मागे घेतलेली आहे व त्यांची उमेदवारी मागे घेण्या संबंधीची नोटीस स्विकारण्यात आलेली आहे.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या महापौर पदाचे एका जागेकरिता बहल योगेश मंगलसेन हे एकच उमेदवार असल्याने बहल योगेश मंगलसेन यांची महापौर पदासाठी बिनविरोध वैधरित्या निवड झाल्याचे मी जाहिर करतो.

ठराव क्रमांक :- ७३९ विषय क्रमांक :- १
दिनांक :- १.१२.२००९ विभाग :- नगरसचिव

महापौर

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या मा.महापौर पदाचे एका जागेकरिता दोन नामनिर्देशनपत्रे मुदतीत दाखल झालेली असून वैध ठरलेली असल्याने व त्यामधील उमेदवार माऊली ऊर्फ ज्ञानेश्वर किसनराव जाधव यांनी त्यांची उमेदवारी रितसर मागे घेतली असल्याने महापौर पदाचे एका जागेकरिता बहल योगेश मंगलसेन हे एकच उमेदवार असल्याने बहल योगेश मंगलसेन यांची पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या महापौर पदावर बिनविरोध रितसर वैधरित्या निवड झाली असल्याचे जाहिर करणेत येत आहे.

सही/-
पिठासीन प्राधिकारी

मा.नगरसचिव :- मुंबई प्रांतिक महानगरपालिका अधिनियम १९४९ चे कलम १९ मध्ये तरतूद केल्याप्रमाणे मा.उपमहापौर यांची निवड मुंबई प्रांतिक महानगरपालिका ( महापौर आणि उपमहापौर या पदांसाठी निवडणुका घेणे) नियम २००५ प्रमाणे करणे.

मा.उपमहापौर निवडणुक कामकाजाची व्हिडीओ चित्रणाद्वारे नोंद घेणेकामी व्हिडीओ चित्रीकरणाची व्यवस्था करणेत आलेली आहे. पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या उपमहापौर पदासाठी एकूण ५ नामनिर्देशनपत्रे मुदतीत दाखल झालेली आहेत. त्यामध्ये उमेदवार व त्यांचे सुचक,अनुमोदक यांची नावे पुढीलप्रमाणे आहेत.

| अ. क्र. | उमेदवारांचे नांव | सुचकाचे नांव | अनुमोदकाचे नांव |
|---|---|---|---|
| १ | प्रकाश धरमसी बाबर | रघुनाथ दलपत वाघ | बाळासाहेब दिगंबर भुंबे |
| २. | आसवानी डब्बु | आझम फकिरभाई पानसरे | अपर्णा निलेश डोके |
| ३. | आसवानी डब्बु | शेट्टी जगदिश | रामआधार धारीया |
| ४. | आसवानी डब्बु | राजेश उर्फ रामकृष्ण गोविंदस्वामी पिल्ले | ननावरे जितेंद्र बाबासाहेब |
| ५. | आसवानी डब्बु | उल्हास शेट्टी | काळूराम मारुती पवार |

मुदतीत दाखल झालेली एकूण पाच नामनिर्देशनपत्रे मा.पिठासिन प्राधिकारी यांच्याकडे सुपूर्द करण्यात येत आहेत.

मा.पिठासीन प्राधिकारी :- उपमहापौर पदासाठी मुदतीत दाखल झालेली एकुण पाच नामनिर्देशनपत्रे माझ्याकडे सुपूर्द करण्यात आलेली आहेत मुदतीत दाखल एकुण पाच नामनिर्देशनपत्रांची छाननी करण्यात आलेली आहे सर्व नामनिर्देशनपत्रे वैध आहेत व स्विकारणेत आलेली आहेत उपमहापौर पदाकरिता वैधपणे नामनिर्देशीत उमेदवारांची नावे पुढीलप्रमाणे आहेत- १) प्रकाश धरमसी बाबर २) आसवानी डब्बु. कोणत्याही उमेदवारास १५ मिनिटांच्या आत म्हणजे सकाळी

११:३२ पासून ११:४७ पर्यंत त्याने सही केलेली लेखी नोटीस देऊन त्याचे उमेदवारी मागे घेता येईल.

( उमेदवारी मागे घेण्यासाठीचा अवधी संपला )

मा.पिठासीन प्राधिकारी :- उमेदवारी मागे घेण्यासाठी दिलेला अवधी संपला आहे उमेदवारी मागे घेण्यासाठी दिलेल्या अवधीमध्ये १) प्रकाश धरमसी बाबर यांनी त्यांची उमेदवारी रितसर मागे घेतलेली आहे व त्यांची उमेदवारी मागे घेण्या संबंधीची नोटीस स्विकारण्यात आलेली आहे.

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या उपमहापौर पदाचे एका जागेकरिता आसवानी डब्बु हे एकच उमेदवार असल्याने आसवानी डब्बु यांची उपमहापौर पदासाठी बिनविरोध वैधरित्या निवड झाल्याचे मी जाहिर करतो.

ठराव क्रमांक :- ७३९(अ) विषय क्रमांक :- १
दिनांक :-१.१२.२००९ विभाग :- नगरसचिव

उपमहापौर

पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या उपमहापौर पदाचे एका जागेकरिता दोन नामनिर्देशनपत्रे मुदतीत दाखल झालेली असून वैध ठरलेली असल्याने व त्यामधील उमेदवार प्रकाश धरमसी बाबर यांनी त्यांची उमेदवारी रितसर मागे घेतली असल्याने उपमहापौर पदाचे एका जागेकरिता आसवानी डब्बु हे एकच उमेदवार असल्याने आसवानी डब्बु यांची पिंपरी चिंचवड महानगरपालिकेच्या उपमहापौर पदावर बिनविरोध रितसर वैधरित्या निवड झाली असल्याचे जाहिर करणेत येत आहे.

सही/-

पिठासीन प्राधिकारी

मा.पिठासीन प्राधिकारी :- महापौर पदावर निवड झालेले बहल योगेश मंगलसेन व उपमहापौर पदावर निवड झालेले आसवानी डब्बु या दोघांचेही मी अभिनंदन करतो आणि सभेचे कामकाज संपलेले आहे असे जाहिर करतो.

सही/-
( उमाकांत दांगट )
पिठासीन प्राधिकारी

पिंपरी चिंचवड महानगरपालिका
नगरसचिव कार्यालय
क्रमांक - नस/४/कावि/ ३५४ /०९
दिनांक - १ / १२ /२००९

सही/-
नगरसचिव
पिंपरी चिंचवड महानगरपालिका
पिंपरी - १८.

प्रत : सर्व संबंधित शाखाप्रमुख व शाखाधिकारी यांजकडे पुढील योग्य त्या कार्यवाहीसाठी रवाना.